...सिक प्लॉट नं ७ ... श्री. रमेश ...
... १२, नवी...

५. तरी वादीची मे. न्यायालयास नम्र विनंती की, नि. ५ चे निकालास आव्हानीत करणेकरिता व त्याकामी होणा-या पुढीलआदेशाकरिता नि. ५ वरील आदेश स्थगित करून अपिलाच्या कालावधीपर्यंत प्रतिवादी यांनी मिळकतीची जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश करावेत.

प्रतिवादी क. २

ठिकाणः- खालापूर

दिनांकः- १७/०१/२०२०

**व्हेरिफिकेशन**

**श्री. श्यामसुंदर श्रीधर साळवी**, वय ५८ , धंदा - नोकरी, रा. नढाळ, पो. लोधीवली ,ता. खालापूर, जि. रायगड सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर लिहिलेला सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

प्रतिवादी क. २

ठिकाणः- खालापूर

दिनांकः- १७/०१/२०२०

Adv. Vikas T.mkar

आ

वादी यांचे विधीज्ञ श्री. व्ही.टी. म्हात्रे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले नाही. नि.5 वरील अर्जावर दिनांक 10/1/2020 रोजी आदेश पारीत करून सदरचा अर्ज फेटाळण्यात आलेला आहे. या आदेशाने बाधीत होवून वादी वरीष्ठ न्यायालयात दाद मागु इच्छितो. नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम 151 च्या अधिकारास अधिन राहून नि.5 वरील अर्जावर पारीत आदेशास दिनांक 27/01/2020 पर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. प्रतिवादी व वादी यांनी या आदेशाची नोंद घ्यावी. वादी यांने या आदेशाची माहितीप्रकरणी नोटीस पाठवून द्यावी. वादी यांनी दिनांक 27/01/2020 पर्यंत वरिष्ठ न्यायालयाकडून नि.5 वरील आदेशास स्थगिती न मिळविल्यास प्रस्तुत अर्जावरील आदेशानुसार दिलेली स्थगिती आपोआप संपुष्टात येईल.

VSMhatre
17/01/2020.

नि. ८३/३

**खालापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात**

रे.मु.क ७९/२०१९

श्री. श्रीकांत श्रीधर साळवी व इतर १ - वादी

विरुध्द

श्री. संतोष गजानन मोरे व इतर - प्रतिवादी

**सदर कामी वादीतर्फे दिवाणी प्रकिया संहिता कलम १५१ अन्वये अर्ज की,**

१. प्रस्तुतचे प्रकरण हे तडजोडीकरिता दि. ०८/०२/२०१९ रोजी मे. न्यायालयात ठेवलेले आहेत. मागील ता. १०/०१/२०२० रोजी मे. न्यायालयाने दाव्यातील रोजनाम्यावर नि. ५ अर्ज फेटाळल्याचे आदेश पारीत केलेले आहे असे समजताच या वादीने प्रस्तुतची सही शिक्क्याची प्रत मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत निकालास वादीला पनवेल जिल्हा न्यायालयात आव्हानीत करणेचे आहे परंतु प्रत प्राप्त होवून तशी तयारी करणेसाठी १० ते १५ दिवसांचा अवधी जाणार आहे.

O

Deft. to say.

17/01/20.

२. दरम्यान प्रतिवादी क. १ व २ यांनी स्थगिती आदेश फेटाळल्याचे समजताच मिळकत्तीचे बांधकाम जोराने सुरू केलेले आहे प्रस्तुत दाव्याशी प्रतिवादी क. ३ चा संबंध असल्यावाबत मे. न्यायालयाने .जरी अक्षेप घेतला असला तरी तो नि. ५ च्या आदेशावर व्यथित होवून अपिलातील न्यायनिर्णयावर अवलंबून राहील. परंतु दरम्यान प्रस्तुतचे बांधकाम पुर्ण झाल्यास या वादीचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे असे नुकसान होईल व दाव्याचे प्रयोजन देखील संपुष्टात येणार आहे प्रतिवादी क १ व २ यांनी वादीचे दावा मिळकतीत बांधकाम करीत असल्याचे स्वतः कबुली दिलेली आहे.

३. या वादीचे असे म्हणणे आहे की, नि. ५ चे आदेशाची प्रत प्राप्त होवून त्यावर अपिल दाखल करेपर्यंत व दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीनुसार अपिलाचा १ महिन्याचे कालावधीपर्यत प्रतिवादी क. १ व २ अथवा त्यांचे संबंधीतांनी दावा मिळकतीची आहे ती परिस्थती ठेवण्याचे आदेश होणे आवश्यक असल्याने प्रस्तुत अर्ज मे. न्यायालयात देत आहे.

४. या अर्जापुष्टर्थ वादीने त्यांचे प्रतिज्ञालेख जोडलेले आहे.